"परभणी जिल्हयातील सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थिती व परिणामांचा अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विदयाशाखे अंतर्गत अर्थशास्त्र

विषयातील पीएच.डी. पदवीच्या नोंदणीसाठी सादर करण्यात येणारा आराखडा

संशोधक

अर्जुन रामराव ढोणे

एम.ए. (अर्थशास्त्र)

समाजिकशास्त्रे संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मार्गदर्शक

प्रा.डॉ. शालिनी उत्तमराव कदम

सामाजिकशास्त्रे सकुंल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

जुलै– 2022

प्रस्तावना :

प्राचीन काळापासुन भारतीय लोकांच्या व्यवसाय शेती हा आहे. मानवाच्या आस्तित्वापासुन शेती अस्तित्वात आहे. प्राचीन काळात खेडयात कुटीर व लघु उदयोगधंदे होते, परंतु ब्रिटीशांच्या राजवटीत ते नष्ट झाले. त्यामुळे खेडयात राहणाऱ्या लोकांच्या उपजिवीकेचे साधन शेती आहे. शिवाय राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा महत्वाचा आहे. महात्मा गांधीजींच्या शब्दात "भारतीय शेती ही भारतीय लोकांच्या उपजिविकेचे प्रमुख साधन असल्यामुळे शेती हा भारताचा आत्मा आहे.'' हजारो वर्षापासुन शेतीने भारतात लोकांचे आचार–विचार, दृष्टीकोन व संस्कृतीची घडण केली आहे. भारतीय भौगोलिक रचना आणि लोकसंख्या या दोघांचा विचार काळाच्या ओघात या व्यवसायात अनेक बदल झाले असले तरीही अन्य व्यवसायापेक्षा वेगळया प्रकारचे वैशिष्टय शेतीचे आढळुन येतात. निसर्गावरील अवलंबनामुळे शेती व्यवसायात नियोजन करण्याइतपत देखील अनेक अडथळे येतात.

जगातील जवळपास दोन–तृतीयांश लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हाच आहे. भारतासारख्या देशात तर सुमारे 70% लोक आजही शेतीवर अवलंबुन असुन राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा फार महत्वाचा आहे. भारतातील एकुण निर्यातीपैकी 17% निर्यात शेती क्षेत्रातुन केली जाते. शेती क्षेत्राकडुन साखर उदयोग, ताग उदयोग, खाद्यतेल उदयोग, कापड उदयोग, चहा, कॉफी, रबर, मसाल्याचे पदार्थ, अन्यधान्यावर प्रक्रिया उदयोग अशा अनेक उदयोगांना शेती क्षेत्रातुन मदत केली जाते. आज राष्ट्रीय उत्पन्नातील 24%उत्पन्न हे शेती व्यवसायातुन प्राप्त होते. विकसीत देशांच्या तुलनेत भारतातील हा वाटा फार मोठा आहे. विकासातील अर्थव्यवस्थेचे कृषीप्रधान हे वैशिष्टय असते. असे असले तरीही शेती क्षेत्र मागासलेले आहे. शेती हा आर्थिक विकासाचा पाया मानला जातो. शेती शिवाय अन्य क्षेत्राचा विकास जलद होऊ शकत नाही. औद्योगिकरण निर्यात, अन्नधान्याचा पुरवठा, रोजगार निर्मिती इत्यादी अनेक बाबी शेती व्यवसायावर अवलंबुन असतात. कृषीप्रधान अर्थव्यवस्थेचे रूपांतरण औद्योगिक अर्थव्यवस्थेमध्ये होण्यासाठी शेतीचे निर्वाहपर स्वरूप बदलुन तिला व्यापारी स्वरूप यायला हवे. या क्षेत्राची क्षमता पुर्णपणे कामात येवु शकणार नाही. हा बदल घडवुन आणणे हा केवळ तांत्रिक सुधारणांचा प्रयत्न नाही, सिंचन, खते, नवीन बियाणे, सुधारित अवजारे इत्यादी तंत्रात्मक सुधारणा तर व्हायलाच हव्यात. पण त्यासाठी आधी शेतकऱ्यांच्या दृष्टीकोनात बदल होने आवश्यक आहे. अज्ञानी दैववादी आणि

असहाय्य शेतकरी सुधारनांसाठी प्रवृत्त होने कठीण असते. त्यासाठी शेतीकडे पाहण्याचा त्यांच्या दृष्टीकोनात बदल व्हायला हवा.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या शेती क्षेत्राच्या अनेक समस्या आहेत. भारतीय लोकसंख्या, आर्थिक धारण क्षेत्राचा अभाव उत्पादकता, पाणीपुरवठयाच्या अपुऱ्या सोयी, तांत्रिक ज्ञानाचा अभाव, भांडवलाचा अभाव जमीनीचे तुकडीकरन, इत्यादी अनेक समस्यांना तोंड देण्यासाठी योजना काळात अनेक प्रयत्न झाले आहेत. परंतु आज मोठया प्रमाणात हया समस्या आपणाला पहायला मिळतात. स्वातंत्रसमयी आपल्या देशातील शेतीचे स्वरूप मागासलेले होते. अत्यंत जुन्या आणि परंपरागत पद्धतीने शेती केली जात होती. यांत्रिकीकरण अभावाने दिसत होते. शेतकरी केवळ निर्वाहाकरिता शेती करीत होते. जमिनदारी पद्धतीने शेतकऱ्याचे जमीनीवरील स्वामित्व नाकारले गेले. पर्यायाने शेतजमिनी स्थिर स्वरूपाच्या सुधारणांचा अभाव होता. जमिनदारी पध्दतीत कास्तकऱ्यांच्या शोषणावर आधारित होती. कुळाकडुन जमिनी कसुन घेतल्या जात असत. कुळांना कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क नव्हते. स्वातंत्र प्राप्तीनंतर जमीनीविषयक सुधारनांमध्ये जे प्रयत्न झाले. यात प्रामुख्याने कुळ कायदा, तुकडेबंदी कायदा, तुकडेजोड, आदिवासी जमीनीविषयक कायदा इत्यादीमुळे शेती विकासाला गती मिळाली. पंचवार्षिक योजना, हरीतक्रांती, कृषी विषयक धोरणे यामुळे नवीन तंत्रज्ञानाचा वापर हा सिमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांना योग्य अशा प्रमाणात करता आला नाही. परिणामी त्यांच्या पुढे अनेक संकटे व समस्या ह्या कायम राहिल्या.

1.1 आर्थिक विकासात कृषी क्षेत्राचे स्थान :

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत व आर्थिक विकासात कृषी क्षेत्राचे किती महत्व आहे. याबाबत वेगवेगळया अर्थतज्ञांनी आपली मते मांडली आहेत. प्रा. रॅग्नर नर्क्स या अर्थतज्ञाने समतोल विकासाचे तत्व विषद करतांना असे नमुद केले आहे की, "सर्वसाधारण आर्थिक प्रगतीसाठी शेतीचा विकास आवश्यक आहे. ॲडम स्मिथ यांनी देखील संपत्तीच्या उत्पादन कार्यात कृषी क्षेत्राला स्थान दिले आहे. त्याचप्रमाणे विल्सन, बारसोडी, बार्कर इत्यादींच्या मते "शेती हे अर्थव्यवस्थेचे मुलभुत क्षेत्र आहे.[1] थोडक्यात असे म्हणता येईल की कोणत्याही अर्थव्यस्थेच्या विकासात शेतीचे योगदान सर्वश्रेष्ठ आहे. मानवाच्या विविध गरजा असल्या तरीही अन्यधान्य ही मानवाची मुलभुत गरज आहे. वाढत्या लोकसंख्येला पर्याप्त प्रमाणात अन्यधान्याचा पुरवठा करण्याठी कृषी क्षेत्राचे अनन्यसाधारण असे महत्व आहे.

विकसीत देशांच्या विकसीनशील देशांच्या बाबतीत कृषी महत्वात अधीकच भर पडते. याचे मुख्य कारण म्हणजे या देशांचा वार्षिक वृध्दीदर कमी असतो. व अन्न धान्यांच्या मागणीची लवचीकता अधिक असते. त्यामुळे पुरेशा प्रमाणात अन्यधान्याचा पुरवठा न झाल्यास तेथील लोकांचे राहणीमान खालावते. प्रा. शाल्टझ म्हणतात की "कोणतेही राष्ट्र अन्यधान्याच्या बाबतीत स्वयंपुर्ण झाल्याशिवाय आर्थिक विकासाची कल्पना करू शकत नाही. म्हणूनच अन्यधान्याच्या बाबतीतील स्वयंपुर्णता व आर्थिक विकासात अनन्यसाधारण महत्व आहे.[2] एखादया अर्थव्यवस्थेचा विकास होतांना अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्रांबरोबरच इतर क्षेत्र ही विकसीत होतात. त्या क्षेत्रात श्रमाची गरज भासते. तेव्हा कृषी क्षेत्रातुन हे श्रम उपलब्ध होतात. अर्थव्यवस्थेच्या प्राथमिक अवस्थेमध्ये शेती हाच एकमेव मोठा व्यवसाय असल्याचे आढळुन येवुन मोठया प्रमाणात श्रमिक याच कार्यात कार्यरत असतात. प्रा. रोस्टो हे आपल्या सिध्दांतात म्हणतात की, "अर्थव्यवस्थेच्या उड्डाणपूर्व अवस्थेत 70 ते 80 प्रतिशत लोकसंख्या शेती व संलग्न व्यवसायात कार्यरत असते." वास्तविक पाहता इतक्या श्रमिकांची गरज शेतीत नसते. पण उत्पादक काम नसल्यामुळे ते शेतीतच गूंतुन राहतात. प्रा. लेवीस यांच्या मते "अशा श्रमिकांची सीमांत उत्पादकता कधी कधी भाून्य असते किंवा ऋणही असते. ज्यावेळी कृषि व्यतिरिक्त क्षेत्रात मनुष्यबळाची आवश्यकता भासते तेव्हा हे अतिरिक्त श्रमिक त्या क्षेत्राकडे वळविता येतात. या स्थानांतरामुळे शेतीच्या उत्पादकतेवर परिणाम न होता शेतीवरील लोकसंख्येचा ताण कमी होतो.[3]

आर्थिक विकासात कृषी क्षेत्र महत्वाची भुमिका बजावतेच त्याचप्रमाणे वाढत्या लोकसंख्येला प्रत्येक्ष किंवा अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधीत उपलब्ध करते. कृषी क्षेत्राच्या विकास प्रक्रियेत तसेच रोजगाराच्या संधीच्या निर्मितीमध्ये तुलनेने कमी भांडवल लागते. यामुळेच विकसीनशील देशात कृषी क्षेत्रातुनच रोजगाराच्या जास्त संधी उपलब्ध होतात. यातुनच लोकांची क्रयशक्ती वाढुन एकुण मागणीत वाढ होते. व आर्थिक विकासाला चालना मिळते. थोडक्यात आर्थिक विकासात कृषी क्षेत्राचे स्थान महत्वपुर्ण आहे.

1.2 भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्व :

देशाच्या आर्थिक विकासात शेतीक्षेत्राला महत्वाचे स्थान आहे. देशातील लोकसंख्येच्या प्राथमिक गरजा पुर्ण करण्यासाठी, औद्योगिक विकासासाठी, कच्च्या मालाचा

पुरवठा करणारे एक क्षेत्र म्हणुन शेती व्यवसायाकडे पाहिले जाते. देशातील अर्थव्यवस्थेत शेतीला किती महत्व आहे. हे पुढील बाबींवरून स्पष्ट होते.

1) उपजीविकेचे प्रमुख साधन :

देशातील एकूण लोकसंख्येपैकी 74% लोक ग्रामीण भागात राहतात. अशा लोकांची प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष उपजिवीका शेती आणि संलग्न व्यवसायावर अवलुंबुन आहे. शहरी भागात राहणाऱ्या 26% लोकांची उपजिवीका शेतीतुन येणाऱ्या उत्पादनावर अवलंबुन आहे.

2) राष्ट्रीय उत्पादनातील शेतीक्षेत्राचा वाटा :

भारतासारख्या देशातील राष्ट्रीय उत्पादनातील शेती क्षेत्राचा वाटा मोठा आहे. सन 1950–51 मध्ये राष्ट्रीय उत्पन्नातील शेती क्षेत्राचा वाटा 57 टक्के इतका होता. इतर देशातील राष्ट्रीय उत्पन्नाबरोबर ही तुलना केल्यास हे प्रमाण मोठे आहे. उदा. युनायटेड किंगडममध्ये एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील शेती क्षेत्राचा वाटा केवळ 2 टक्के आहे. अमेरिका 3 टक्के, आस्ट्रेलिया 5 टक्के, कॅनडा 4 टक्के, इतका राष्ट्रीय उत्पन्नातील सहभाग आहे. याचा अर्थ भारतातील शेतीचे महत्व आजही कमी झालेले नाही. देशातील प्रचंड लोकसंख्या ग्रामीण भागात केंद्रीत झालेली आहे. रोजगाराच्या अन्य संधीच्या अभावाने शेती क्षेत्रातील रोजगारीला विशेष महत्व आहे.

3) लोकांना अन्यधान्यांचा पुरवठा :

लोकांना अन्यधान्यांचा पुरवठा करण्यासाठी कृषीमध्ये मोठया प्रमाणात पिके घेतली. जातात. यामध्ये प्रामुख्याने तांदुळ, ज्वारी, बाजरी, गहु, तेलबिया, कडधान्य इत्यादी अन्यधान्याचा समावेश होतो. हरितक्रांतीमुळे कृषि क्षेत्रात झालेल्या बदलातुन उत्पादन वाढ मोठया प्रमाणात झालेली दिसुन येते. प्रचंड मोठया लोकसंख्येला अन्यधान्याचा पुरवठा करण्यासाठी कृषी क्षेत्राचा विचार केला जातो.

4) सरकारी उत्पन्नाचे प्रमुख साधन :

सरकारी उत्पन्नाचे प्रमुख साधन म्हणुन भारतीय शेती व्यवसायाला महत्वाचे स्थान आहे. देशाच्या राष्ट्रीय उत्पादनात कृषी क्षेत्र औद्योग क्षेत्र आणि सेवा क्षेत्रांचा समावेश होतो. शेतीवर लावण्यात येणाऱ्या वेगवेगळया करांव्दारे सरकारला उत्पन्न मिळते. केंद्र आणि

राज्यातुन जमीन महसुल शेतसारा, पानपट्टी, मुद्रांक शुल्क, जमिन विक्रीकर यासारख्या विविध मार्गाने शेतीतुन उत्पन्न मिळत असते. खात्रीचे साधन म्हणुन भारतीय कृषी क्षेत्राचा विचार होतो.

5) आर्थिक स्थिरता :

देशातील जनतेला आर्थिक स्थिरता प्राप्त करून देण्यासाठी कृषीची भूमिका ही अत्यंत महत्वाची आहे. प्रा. गुन्नार मिडील यांनी जगातील विकसित आणि विकसीनशील देश यांच्यातील आर्थिक विषमता ही कृषीवरील अवलंबून राहण्यावरून प्रमाणात वाढ झाल्यामुळे वाढते. अशा आशयाचे विचार व्यक्त केले होते. ग्रामीण भागीत जनतेला आर्थिक स्थिरता प्राप्त करून देण्यामध्ये कृषी क्षेत्राची भुमिका महत्वाची आहे.

6) अन्यक्षेत्राच्या विकासाला चालना :

शेती क्षेत्राच्या विकासाबरोबर वाहतूक–दळणवळण, गोदाम व्यवसाय प्रक्रिया उदयोग शेती अवजारे, पंपसेट, औषधे विपनन व्यवस्था, रासायनिक खते, यांच्या क्षेत्रातील रोजगाराच्या संधीमध्ये वाढ होते.

देशाच्या आर्थिक, सामाजिक विकासात शेती व्यवसायाचे महत्व नाकारता येत नाही. औदयागिक प्रगतीसाठी शेती विकास आनिवार्य आहे. अर्थव्यवस्थेतील प्रत्येक क्षेत्राचा शेती व्यवसायाबरोबर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष संबंध जोडला गेलेला आहे.

1.3 परभणी जिल्हयाची पार्श्वभुमी :

प्राचीनकाळी परभणीला प्रभावती नावाने ओळखले जात होते. महाराष्ट्र राज्यातील दख्खन पठारावर असलेल्या मराठवाडा विभागात 8 जिल्हयापैकी परभणी हा एक जिल्हा होय. हा जिल्हा महाराष्ट्र राज्यात पुर्वेस वसलेला आहे. परभणी जिल्हयाचे क्षेत्रफळ 6332 चौ.कि.मी आहे. जिल्हयाची समुद्रसपाटीपासुन सर्वसाधारण उंची 457 मीटर आहे. जिल्हयात सर्वात उंच भाग जिल्हयाच्या पश्चिम दिशेला असलेल्या अजिंठा पर्वतात असून त्याची उंची 579.70 मीटर आहे. जिल्हयातील सर्वात कमी उंचीचा भाग जिल्हयाच्या पुर्वेस जेथे गोदावरी नदी जिल्हयाची सिमा पार करते तेथे 366 मीटर आहे. पश्चिमेकडुन पुवेकडे सर्वसाधारणपणे उतार असल्याचे स्पष्ट होते. गोदावरी ही जिल्हयातील प्रमुख नदी आहे. गोदावरी नदीने वाहून आणलेल्या गाळामुळे जिल्हयातील तिच्या काठचा प्रदेश सुपीक बनलेला आहे.

महाराष्ट्रातील शेती पावसावर अवलंबुन असुन परभणी जिल्हा हा हमखास पाऊस पडणारा जिल्हा आहे. त्या अनुषंगाने लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. खरीप हंगामात ज्वारी, कापूस, मुग सोयाबीन ही चार पिके प्रामुख्याने जिल्हयात घेतली जातात. जून ते सप्टेंबर या कालावधीत नैऋत्य मोसमी वाऱ्यांपासुन मिळणारा पाऊस पिक वाढण्यास मदत करतो. जमीनीतील आवश्यक द्रव्यांची भरपूर उपलब्धता व पिकास पोषक हवामान असल्याने जिल्हात खरीप हंगामात भरघोस पिक येते. याशिवाय ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत जिल्हयात ईशान्य वाऱ्यापासुन पाऊस पडतो. हा पाऊस रब्बी हंगामातील पिकास पोषक ठरतो. रब्बी हंगामात ज्वारीचे पिक मोठया प्रमाणात घेण्यात येते. रब्बी हंगामातील ज्वारी पांढरी शुभ्र असुन ती चवदार असते. याशिवाय तुर, गहु, भुईमूग, करडी यांचे उत्पन्न मोठया प्रमाणात जिल्हयात घेण्यात येते. म्हणुन पिकांच्या दृष्टीने परभणी जिल्हा महाराष्ट्रातील महत्वाचा जिल्हा आहे. परंतु परभणी जिल्हयातील शेती व्यवसाय पावसावर निर्भर असल्यामुळे जमिनीच्या गुणवत्तेच्या तुलनेत अपेक्षित कृषी उत्पादन मिळत नाही. याला विविध शेती विषयक समस्या कारणीभुत आहेत. परभणी जिल्हा 18.45 ते 20.01 या उत्तर अक्षांशावर 76.13 ते 77.26 पुर्व रेखांक्षावर या भागौलिक पट्टयांमध्ये वसलेला आहे. जिल्हयाच्या उत्तरेस बुलढाणा व हिंगोली पश्चिमेस जालना दक्षिणेस बीड आणि लातुर व पुर्वेस नांदेड हे जिल्हे आहेत.

2011 च्या जनगणनेनुसार परभणी जिल्हाची एकुण लोकसंख्या 18,36,086 असून, त्यापैकी 9,42,870 पुरूष तर 8,93,216 स्त्रिया आहेत. त्यांची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी 51.35 व 48.65 टक्के एवढी आहे. सन 2011 च्या जनगणनेनुसार जिल्हातील एकुण लोकसंख्येपैकी परभणी तालुक्यात 29.29 टक्के, जिंतुर तालुक्यात 15.40 टक्के गंगाखेड तालुक्यात 11.5 टक्के, पाथरी तालुक्यात 7.57 टक्के मानवत तालुक्यात 6.36 टक्के, सोनपेठ तालुक्यात 4.88 टक्के, पालम तालुक्यात 6.29 टक्के, पुर्णा तालुक्यात 9.95 टक्के तर सेलु तालुक्यात 9.21 लोक राहतात.

सीमांत व अल्पभूधारक शेतकरी व्याख्या व अर्थ :

कोणत्याही देशाच्या विकासात सेवा उदयोग आणि कृषी क्षेत्राचा सिंहाचा वाटा असतो. प्रत्येक क्षेत्राचा विकास एकमेंकावर अवलंबुन असतांना आपणाला दिसतो. भारतीय कृषी उत्पादन पध्दती श्रमप्रधान असल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेती वर्गाला महत्वाचे

स्थान प्राप्त आहे. यात सिमांत व अल्पभुधारक यासारखे शेतीचे वर्ग आहेत. पारंपारिक शेती, कर्जबाजारीपणा, अपुऱ्या सोयीसुविधा, कनिष्ठ राहणीमान, आर्थिक सामाजिक मागासलेपणा, इत्यादी कारणांमुळे सद्यस्थितीला सिमांत व अल्पभुधारक शेतकरी वर्गाचे दैयनीय अशी दुर्दशा वाढली आहे. शेतकऱ्यांच्या मुलाधार म्हणजे शेती आहे. तुकोबारायांनी तिची मध्यम उत्तम व कनिष्ठ अशी प्रतवारी केली आहे. जमीन कसतांना ही प्रतवारी लक्षात घ्यावी लागते.

व्याख्या :

"एक हेक्टरपेक्षा कमी जमीन असलेला शेतकरी म्हणजे अल्पभुधारक होय."

"जमीनीची धारणक्षमता कमी असलेला शेतकरी म्हणजे अल्पभुधारक होय."

अल्पभुधारक म्हणजे कमी शेती असलेला शेतकरी होय. अल्पभुधारक असणे म्हणजे एकप्रकारची मागास शेती असणे. त्या अल्पभुधारकतेतुन उत्पन्न कमी प्राप्त होते. तसेच अल्पभुधारकतेमुळे शेतकऱ्याचे कर्ज वाढते. परिणामी शेतकऱ्याचे राहणीमान खालावते.

महाराष्ट्र कर्जनिवारण कायदा 1975 मधील कलम 2 (ह) नुसार "भिजवणीखाली नसलेली एक हेक्टर पेक्षा कमी जमीन कसणारा तसेच वरील मर्यादेपर्यंतची जमीन कसणारे कुळ किंवा बटाईने लागवडीखाली आणणारा शेतकरी म्हणजे सिमांत शेतकरी होय.

महाराष्ट्र कर्जनिवारण कायदा 1975 मधील कलम 2 (म) नुसार "जो शेतकरी, एक हेक्टरपेक्षा जास्त परंतु दोन हेक्टरपेक्षा कमी असलेली जमीन व्यक्तीशः कसतो तसेच वरील मर्यादेपर्यंत असलेली जमीन कसणारे कुळ किंवा बटाईदार हे अल्पभुधारक शेतकरी या व्याख्येत येतात.

थोडक्यात सिमांत शेतकरी म्हणजे असा वर्ग की ज्यांचे धारणक्षेत्र एक हेक्टरपेक्षा कमी आहे. आणि अल्पभुधारक म्हणजे असा शेतकरी की ज्यांच्या धारणक्षेत्राची मर्यादा 2 हेक्टर आहे. 4 हेक्टर पेक्षा जास्त जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांचा समावेश मोठे शेतकरी या गटात करण्याचा संकेत आहे. भारतातील शेतकऱ्यांच्या धारण क्षेत्राचा विचार करता असे दिसुन येते की, सिमांत व अल्पभुधारक शेतकऱ्यांच्या संख्येत वाढ होत आहे.

समस्यासुत्रण :–

"परभणी जिल्हातील आर्थिक व सामाजिक क्षेत्रामध्ये सिमांत व अल्पभुधारक शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत हालाखीची आणि दैयनिय अशा स्वरूपाची असुन कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी कृषी किंवा मजुरीवर अवलंबुन रहावे लागते. व मिळणाऱ्या रोजंदारीवर कुटुंबाची उपजिवीका ही त्याला भागवावी लागते.

2016–17 या वर्षाच्या स्थायी स्वरूपाच्या जमीन वापराच्या माहितीनुसार जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्र 6,31,115 हेक्टर आहे. त्यापैकी जंगलव्याप्त क्षेत्र 10,180 हेक्टर आहे. भौगोलिक क्षेत्रापैकी 41,653 हेक्टर क्षेत्र शेतीला उपलब्ध नाही. 2016–17 या वर्षात निव्वळ क्षेत्र सर्वात जास्त परभणी तालुक्यात 80643 तर सर्वात कमी सोनपेठ तालुक्यात 33,934 हेक्टर एवढे आहे.

2010–11 च्या कृषी गणनेनुसार जिल्हयात एकुण 3,47,918 जमिनधारक आहेत. त्यांनी धारण केलेले एकुण क्षेत्र 5,682,66.34 हेक्टर आहे. 2 हेक्टर पेक्षा कमी क्षेत्र धारण केलेले 2,57001 जमीनधारक असुन त्यांनी 2,54,902.02 क्षेत्र धारण केलेले आहे. 2 ते 5 हेक्टर जमीन धारण केलेले क्षेत्र 79,333 धारकांनी धारण केलेले क्षेत्र 2,29,080 आहे. 5 ते 10 हेक्टर जमीन धारण केलेल्या क्षेत्र 10,570 धारकांनी 68,015.59 क्षेत्र धारण केले आहे. 10 ते 20 व 20 हेक्टर पेक्षा अधिक धारण केलेले अनुक्रमे 938 आणि 76 जमीनधारक आहेत. व त्यांनी 11,484.97 आणि 4,783.62 क्षेत्र धारण केलेले आहे.

वरील आकडेवारीतुन असे दिसुन येते की, सीमांत व अल्पभुधारक शेतकऱ्याचे प्रमाण जास्त आहे. सिमांत अल्पभुधारक शेतकऱ्याचे महत्वपुर्ण योगदान जिल्हाच्या विकासात आहे. परंतु त्यांना असणाऱ्या समस्यांची यादी खुप मोठी आहे. बेमोसमी पाऊस, ओला दुष्काळ, बाजारपेठेतील बाजारभावातील होणारी घसरण, शेतीसाठी सावकार किंवा बॅकेकडुन घेतलेले कर्ज, खते कश्याप्रकारे वापरावयाची, पाणी, वीज, शेतीचे तुकडीकरण, व्यापाऱ्यांकडुन होणारी पिळवणुक यासारख्या असंख्य संकटांना सिमांत व अल्पभुधारक शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे. परभणी जिल्हाच्या विकासात महत्वाचे योगदान असलेल्या सिमांत व अल्पभुधारक शेतकऱ्यांचा अभ्यास करून त्यावर उपाय सुचविणे आवश्यक आहे. म्हणुन याचा

अभ्यास **करण्यासाठी "परभणी जिल्हयातील सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थिती व परिणामांचा अभ्यास" हा संशोधन विषय निवडला आहे.**

संशोधनाचे उदिष्टे :

संशोधन कार्य हाती घेत असतांना संशोधन कार्य सुरू करण्यापुर्वी त्याचे उदिष्टे निश्चित करावी लागतात. त्याशिवाय संशोधन कार्याला योग्य दिशा मिळणार नाही. यासाठी परभणी जिल्हयातील सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थिती व परिणामांचा अभ्यास या विषयाचे अध्ययन करण्यासाठी पुढील उदिष्टे निश्चित केली आहेत.

1. सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे.
2. सीमांत व अल्पभुधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीतील बदलांच्या कारणांचा अभ्यास करणे.
3. सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीतील बदलांच्या परिणामांचा अभ्यास करणे.
4. सीमांत व अल्पभूधारक शेतकरी यांना मिळालेल्या शासकीय योजनांची परिणामकता तपासणे.

संशोधनाची गृहितके :

1. सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा दर्जा निम्न आहे.
2. सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या मोठया प्रमाणात कर्जबाजारीपणा आढळून येतो.
3. परभणी जिल्हयातील सीमांत व अल्पभुधारक शेतकऱ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत आहे.

संशोधन पध्दती :

"परभणी जिल्हयातील सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थिती व परिणामांचा अभ्यास" प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी परभणी जिल्हा निवडण्यात आला असून या साठी सर्वेक्षणात्मक विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येईल संशोधन कार्यासाठी

माहितीचे संकलन प्राथमिक आधार सामग्री व दुय्यम आधार सामग्री यांच्या आधारे करण्यात येईल.

तथ्य संकलनाच्या पध्दती :

परभणी जिल्हयातील सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांचा प्रत्यक्ष अभ्यास करण्यासाठी प्राथमिक आधार सामग्रीचा वापर करण्यात येईल यासाठी निरीक्षण, मुलाखत, अनसूची व मुलाखती या पध्दतीचा अवलंब केला जाईल. तसेच दुयम तथ्यसंकलनासाठी परभणी जिल्हा गॅझेटीयर, परभणी आर्थिक व सामाजिक समालोचन अहवाल, भारताचे व महाराष्ट्राचे आर्थिक पाहणी अहवाल, संशोधन विषयासाठी व सबंधीत पी.एच.डी. प्रबंध, विविध शासकीय प्रकाशने, शासकीय संकेत स्थळे, नियतकालीके, अध्ययन विषयाशी निगडीत संदर्भ ग्रंथ व अहवाल, संशोधनात्मक लेख, अप्रकाशीत प्रबंध, अंक, मुखपत्रे व विविध संगणकीय संकेत स्थळे इत्यादी मधुन माहिती संकलन केले जाईल.

नमुना निवड :

प्रस्तुत संशोधन विषयासाठी नमुना म्हणून सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या परभणी जिल्हयातीलएकूण 9 तालुक्यामधुन 450 सीमांत व अल्पभुधारक शेतकरी यादृच्छिक नमुना निवड पध्दतीनुसार अधिक लोकसंख्या असणाऱ्या व जास्त सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या प्रमाण उपलब्ध असणाऱ्या गावाची निवड करण्यात येईल.

तथ्याचे विश्लेषण :

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी सांखिकीय माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, आकडेवारी, वृध्दीदर, सहसंबंध इत्यादी सामग्रीचे विश्लेषण करण्यासाठी सारणी वर्तुळालेख, स्तंभालेख इत्यादीचा उपयोग करण्यात येईल.

संशोधनाची मर्यादा :

परभणी जिल्हयातील बहुतेक अभ्यास हा महत्वपुर्ण सीमांत व अल्पभुधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्ज्ञिथती व परिणामांचा अभ्यास करण्यात येणार आहे. प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी परभणी जिल्हा समग्र म्हणून निवडण्यात येईल. जिल्हयातील

सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या माहिती संकलित केल्या जाईल. हे संशोधन परभणी जिल्हयापुरतेच मर्यादित राहिल.

प्रकरणाची रूपरेषा :

प्रकरण पहिले	–	प्रास्ताविक
प्रकरण दुसरे	–	संशोधन साहित्याचा आढावा.
प्रकरण तिसरे	–	परभणी जिल्हयाचा आढावा.
प्रकरण चौथे	–	परभणी जिल्हयातील सीमांत व अल्पभुधारक शेतकरी यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास.
प्रकरण पाचवे	–	परभणी जिल्हयातील सीमांत व अल्पभुधारक शेतकऱ्यांच्या कारणे व परिणामांचा अभ्यास.
प्रकरण सहावे	–	सीमांत व अल्पभुधारक शेतकऱ्यांसाठी शासनाच्या विविध योजना.
प्रकरण सातवे	–	निष्कर्श व शिफारशी.

संदर्भ सूची :

लेखक	**संदर्भ ग्रंथ**
1. भांडारकर पू. ल.	समाजीक संशोधन पध्दती, प्रकाशन'–अ. अ. कुलकर्णी, नियंत्रक प्रकाशन समिती महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मीती मंडळ, नागपूर जानेवारी–1981
2. आगलावे प्रदिप	संशोधन पध्दती शास्त्र व तंत्र, विद्या प्रकाशन,रूईकर मार्ग, नागपूर जानेवारी–2006
3. तुपे संदिप काकासाहेब	"सीमांत व अल्पभूधारक शेतकरी यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन विशेष संदर्भ औरंगाबाद" पृ.क्र. 2–4
4. डॉ. सुधीर बोधनकर	समाजशास्त्रीय संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, 2007, पृ.क्र. 6
5. मिश्रा पुरी	भारतीय अर्थव्यवस्था हिमालया पब्लिशिंग हाउस, प्रकाशन 2002 पृ.क्र. 26
6. सुंदरम,के.पी.एम. व दत्त रूद्र	भारतीय अर्थव्यवस्था, एस. चन्द्र एण्ड कंपनी लि.– 2008, नवी दिल्ली
7. डॉ. निता वाणी	कृषी अर्थशास्त्र, प्रकाशन पब्लीकेशन, जळगाव.
8. डॉ.स.श्री.मु.देसाई, सौ. निर्मल भालेराव,	कृषी अर्थशास्त्र निराली प्रकाशन पुणे.
9. भारताची आर्थिक पहाणी	वित्त मंत्रालय, भारत सरकार दिल्ली.
10. डॉ. आर. टी. शर्मा	विकासाचे अर्थशास्त्र सिध्दांत आणि धोरण.
11. डॉ. जे. व्ही. कायंदे	शेतीचे अर्थशास्त्र सिध्दांत आणि धोरण चैतन्य पब्लिकेशन, नाशिक, 2003, पृ.क्र. 4
12. डॉ. र.पु. करूलकर, विकासाचे अर्थशास्त्र व सिध्दांत.	विकासाचे अर्थशास्त्र व सिध्दांत.
13. परभणी	जिल्हा आर्थिक व सामाजिक समलोचन वर्ष 2016–17 (संदर्भ वर्ष जनगणना 2011–12)
13. https://shodhganga.inflibnet.ac.in	

संशोधक	संशोधन मार्गदर्शक
अर्जून रामराव ढोणे	**प्रा.डॉ. शालिनी उत्तमराव कदम** सामाजिकशास्त्रे संकुल